प्रा. अशोक देवकर
जिमखाना विभाग
दि. २१ जून २०२४

मा. प्राचार्य सो
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती
जि. पुणे ४१३१०२.

विषय : आंतरराष्ट्रीय योग दिन अहवालाबाबत.

महोदय,

२१ जून, २०२४ रोजी आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिशानिर्देशानुसार आपल्या महाविद्यालयात दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन जिमखाना विभाग, योगशास्त्र विभाग, एन.एस.एस, एन.सी.सी विभाग व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ६.४५ ते ८.00 या वेळेत करण्यात आले होते. या योग दिनाच्या क्रार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनींनी मोठया प्रमाणात सहभाग घेतला होता.

या योगदिन क्रार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांचे शुभहस्ते करण्यात आले यावेळी उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, उपप्राचार्या डॉ. योगिनी मुळे, कनिष्ठ महा. सायन्स शाखेचे समन्वयक प्रा. जी. टी. मोरे, एन. एस. एस विभागाचे डॉ. विलास कर्डिले, एन. सी. सी विभागाचे प्रमुख डॉ. विवेक बळे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयातील योगा विषयाचे डॉ. आर. डी. जगताप यांनी सर्व उपस्थितांना प्रथम विविध आसने व प्राणायामाची प्रात्यक्षिके दाखविली व शरीरावर होणारे त्यांचे फायदे याबद्दल माहिती देऊन सर्वांकडून त्याचा सराव करून घेतला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गौतम जाधव यांनी केले तर प्रा. अशोक देवकर यांनी आभार व्यक्त केले.

कळावे,

आपला विश्वासू

प्रा. अशोक देवकर

Noted
copy to IQAC
21/06/24

सोबत : योग प्रात्यक्षिक फोटो

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

# २१ जून २०२४ - योग प्रात्यक्षिक शिबीर

















TULJARAM CHATURCHAND COLLEGE
BARAMATI

# २१ जून २०२४ - योग प्रात्यक्षिक शिवीर

















TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati